# विद्यार्थी कल्याण विभाग
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

"सेंट्रल प्राव्हि-सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक 513, दिनांक 1 ऑगस्ट 1923, द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"


डॉ. निहाल आर. शेख
संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग

छत्रपति शिवाजी महाराज मुख्य प्रशाकीय परिसर इमारत
क्रमांक २ महाराजबाग चौक
नागपुर – 440010
०७१२–२५४८५८४


स.वि.क./रातुमनाविना/५०२

दिनांक २०/१/२०१७

प्रति,

सर्व प्राचार्य,
सर्व संलग्नीत व संचालित महाविद्यालये
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर

विषय :— मतदार जागृती अभियान

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येत आहे कि दिनांक २३ डिसेंबर,२०१६ च्या महाराष्ट्र शासन परिपत्रका नुसार मतदार जागृती अभियनाकरीता महाविद्यालय स्तरीय समिती गठीत करायचे आहे. या परिपत्रकाच्या अनुषंगाने आपल्याला कळविण्यात येते कि प्रत्येक महाविद्यालयांतर्गत विभागात मतदार जागृती अभियान समन्वय समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीमध्ये महाविद्यालये/संस्था यांचे संचालक/प्राचार्य यांचेसह राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, ज्येष्ठ प्राध्यापक आणि क्रियाशिल विद्यार्थी इत्यादींचा समावेश असावा.

**२) महाविद्यालये/संस्था यांनी खालील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करावे**

**अ) संपर्क अधिकाऱ्याची नियुक्त** :— मतदार जागृती अभियानासाठी संपर्क अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. ज्या महाविद्यालयात या अभियानाकरिता नोडल अधिकारी नेमलेले आहे त्या महाविद्यालयात नोडल अधिकारी संपर्क अधिकारी म्हणून कार्य करतील. ज्याठिकाणी राष्ट्रीय सेवा योजना असेल त्याठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना हे संपर्क अधिकारी म्हणून काम पाहतील. अन्य ठिकाणी ज्येष्ठ प्राध्यापकांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

**आ) विविध कार्यक्रम** :— महाविद्यालये/संस्था यांनी मतदान जागृती अभियानावर आधारीत व्याख्याने, परिसंवाद, वाद विवाद स्पर्धा, पथनाट्ये, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी आयोजीत कराव्यात. तसेच वार्षिक पारितोषीक वितरण समारंभ, युवा महोत्सव, स्नेहसंमेलन या कार्यक्रमाच्या वेळी मतदार जागृतीच्या अनुषंगाने पोस्टर लावून निर्भयपणे मतदान करण्याचा संदेश देण्यात यावा.

**इ) गृहसंकुल दत्तक योजना** :— जवळच्या परिसरातील गृहनिर्माण संस्था आणि विद्यार्थ्यांच्या रहिवाशी संकुल हे दत्तक घ्यावे. या दत्त घेतलेल्या संकुलातील मतदारांनी कोणत्याही अमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन करून तेथे जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी प्रयत्न करावेत.

**ई) वातावरण निर्मीती** :— तरूण वर्गाने पदयात्रा, मानवी श्रृंखला, पथ नाट्य, इ.स्वरूपाचे उपक्रम राबवावेत.

**उ) सामाजिक माध्यमे**:— तरूण वर्गाने या अभियानासाठी जास्तीत जास्त सामाजीक माध्यमांचा जसे— फेसबुक,ट्विटर,गुगल,व्हॉटस्अप,हाईक इत्यादीचा वापर करावा. राज्य निवडणूक आयोगाच्या समाजिक माध्यमांवरील पोस्टचा अधिकाधिक प्रसार करावा.

**ऊ) संकल्प व शपथ** :— प्रत्येक विद्यार्थ्याने मतदान करण्याबाबत संकल्प व शपथ घ्यावी तसेचत्यांनी त्यांच्या कुटूंबियांकडून व शेजाऱ्यांकडून देखील मतदार करण्याबाबत संकल्प व शपथ घ्यावी.

**ऋ) प्रशस्तीपत्र** :— उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व बक्षिसाद्वारे प्रत्येक महाविद्यालयाने गौरव करावा.

7) प्रत्येक महाविद्यालयांनी आपला अभियान कार्यअहवाल विद्यापीठ स्तरीय मतदार जागृती अभियान समितीकडे सादर करावा.

8) विद्यापीठांनी सदरहू अहवाल महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावा.तसेच त्याची प्रत **राज्य शासनास** व **या विभागाला दिनांक 30 मार्च,2017** पर्यंत सादर करण्यात यावा..

आपला

डॉ. निहाल आर. शेख
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग